जल जीवनच्या पाण्यासाठी
कनकावाशी दोन वर्षांपासून प्रतीक्षेत >>पान 2

जलजीवन मिशनच्या कामात
सर्वत्रच गौडबंगाल >>पान 3

अधिकाऱ्यांचे उदासीन धोरण
ग्रामस्थांना मारक >>पान 4

सुविचार

आत्मविश्वासामुळे अशक्य वाटणारेही शक्य होते.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




संभाजीराजांवरचं अतीव प्रेम, विकीचा अभियन बघून चाहता भावुक, बॅनरला दुग्धाभिषेक घातला!

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 186 ■ रविवार, दि. 16 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# लव्ह जिहादच्या विरोधात कायदा
# फडणवीस सरकारचा निर्णय

## राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती केली स्थापन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारनेही आता लव्ह जिहाद आणि जबरदस्तीने धर्मांतर करण्याविरुद्ध कारवाई करण्याची तयारी चालवलीय. यासाठी सरकारने राज्य पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती स्थापन केलीय. ही समिती लव्ह जिहाद आणि सक्तीचे धर्मांतर थांबवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना सुचवणार आहे. महाराष्ट्राचे डीजीपी यांना या समितीचे अध्यक्ष करण्यात आलंय. इतर अनेक राज्यांमध्येही राज्य सरकारांनी कथित लव्ह जिहाद आणि जबरदस्तीने धर्मांतर थांबवण्यासाठी पावले उचललीत आणि आता महाराष्ट्रदेखील यात सामील होणार आहे.

जबरदस्तीने धर्मांतर रोखण्यासाठी समिती उपाय योजणार : महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या समितीमध्ये महाराष्ट्राचे डीजीपी, महिला आणि बाल कल्याण विभाग, अल्पसंख्याक विभाग, कायदा आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि विशेष सहाय्य विभागाचे सचिव तसेच गृह विभागाचे उपसचिव यांचा समावेश आहे. राज्य सरकारने शुक्रवारी या संदर्भात आदेश जारी केलेत. आदेशात म्हटले आहे की, अभ्यासानंतर समिती लव्ह जिहाद आणि जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या घटनांना सामोरे जाण्यासाठी कोणते उपाय योजता येतील हे सांगणार आहे. ही समिती इतर राज्यांमधील यासंबंधीच्या कायद्यांचाही अभ्यास करणार असून, धर्मांतर थांबवण्यासाठी



तरतुदीदेखील सुचवेल आणि त्याच्या कायदेशीर पैलूंचीसुद्धा चाचपणी केली जाईल. लव्ह जिहाद हा शब्द अनेकदा उजव्या विचारसरणीचे कार्यकर्ते आणि संघटना वापरतात, असा आरोप बऱ्याचदा केला जातो. मुस्लिम पुरुषांकडून हिंदू मुली किंवा महिलांशी लग्न करून त्यांना इस्लाम धर्मात रूपांतरित करणे म्हणजेच लव्ह जिहाद असल्याचं बोललं जातंय.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदारांनी अमित शाहांची घेतली भेट : शरद पवार यांच्या पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी गुरुवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. ठाण्यातील भिवंडी परिसरातील ड्रग्ज तस्कर आणि गुन्हेगारांवर कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचं सुरेश म्हात्रे यांनी अमित शाहांना सांगितले. खासदार सुरेश म्हात्रे म्हणाले की, भिवंडी हे गुन्हेगारांचे केंद्र बनलंय आणि या भागात गुन्हेगारी आणि अंमली पदार्थांची तस्करी वाढतेय. अटक होऊनही गुन्हेगार जामिनावर सुटतात आणि पुन्हा गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील होतात. दरम्यान, केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी खासदारांना कारवाईचे आश्वासन दिलंय आणि कायदा अंमलबजावणी संस्थांना त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिलेत.

## तुकाराम बिडकर यांचे जनतेशी चांगले संबंध होते - अजित पवार



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** राष्ट्रवादीचे दिवंगत माजी आमदार प्रा. तुकाराम बिडकर यांच्या कुटूंबियांना भेटण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे अकोल्यात आले होते. अकोल्यातील रामनगर भागातील बिडकर यांच्या घरी कुटूंबियांना भेटत अजित पवार आणि तटकरेंनी सांत्वन केलंय. तुकाराम बिडकर यांचा १३ फेब्रुवारीला अकोल्यालगतच्या शिवर मालवाहक वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला होता. बिडकर राष्ट्रवादीकडून २००४ ते २००९ दरम्यान अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूरचे आमदार होते. याच काळात ते विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष होते. बिडकरांनी जवळपास १३ मराठी चित्रपटांत भूमिका केल्या होत्या. तर दोन चित्रपटांची निर्मितीही केली होती.

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी तत्काळ राजीनामा द्यावा - हर्षवर्धन सपकाळ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** कृषिमंत्री यांच्या वादग्रस्त विधानावर प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, या सरकारचा अहंकार वेगवेगळ्या माध्यमाने आपल्याला बघायला मिळतो. संविधानातून देशाचा मालक सर्वसामान्य जनता आहे. मात्र, आता निवडून आलेले प्रतिनिधी आहेत, त्यांचा ताल त्यांचा बेताल पणा दिसून येत आहे. कृषी मंत्र्यांना लाज वाटली पाहिजे, अशा प्रकारचे बेताल वक्तव्य करताना पीक विम्यात मोठा भ्रष्टाचार आहे. स्वतः भ्रष्टाचार करणारे लोक शेतकऱ्यांवर उपकार केल्यासारखे वागत आहेत. या मध्ये तात्काळ कृषी मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे, ही आमची मागणी आहे.

## क्रांती चौक पोलिसांनी अट्टल गाडी चोराला ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** क्रांती चौक पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या छत्रपती संभाजी नगर येथील मेन बस स्टँड या ठिकाणी गाडी चोरी गेल्याची तक्रार क्रांति चौक पोलीस स्टेशन मध्ये नोंद करण्यात आली होती. त्यानुसार गांधी चौक पोलीस स्टेशनचे पीआय माने यांनी सूत्र हाती घेतले. त्यानंतर खबरेमार्फत त्यांना माहिती मिळाली की, मुजम्मिल युसुफ पठाण वय वर्ष २० राहणार बाजीपुरा छत्रपती संभाजी नगर या व्यक्तीकडे सदरील गाडी असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस स्टेशनचे पीआय माने व त्यांचा स्टाफ यांनी तिथे झाडाझडती घेतली असता, त्याच्याकडे एक गावठी कट्टे आणि चार राऊंड सापडल्या आहेत. अधिक माहिती घेतली असता सदरील गाडी चोरी केल्याची कबुली त्याने दिला आहे. त्यानुसार सदरील व्यक्तीला अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस अधिकारी करत आहेत.

# संत सेवालाल महाराजांचे विचार आत्मसात करा प्रा अरविंद चव्हाण

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** श्री संत सेवालाल महाराज यांनी पशु पक्षी वनराईवर प्रेम करून समाजासाठी चंदनासारखे आयुष्य झिजवले आहे त्यांचे विचार आत्मसात करून आचरणात आणावे म्हणजे जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल असे संत सेवालाल महाराज उत्सव समितीच्या वतीने आयोजित किनगाव जट्टू येथे २८६ व्या जयंतीनिमित्त दिनांक १५ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमात प्राध्यापक अरविंद चव्हाण यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तोतारामजी कायंदे हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये माजी समाज




कल्याण सभापती अभय दादा चव्हाण भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप बीबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील स्टेट बँक शाखेचे व्यवस्थापक अजय पाटील क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड भुमराळा येथील सरपंच संतोष मोरे सावरगाव तेली सरपंच जगाराव आडे भिकाजी इंगळे निलेश महाजन डॉक्टर उमेश कायंदे गोपाल काबरा डॉक्टर गजानन आडे पँथरचे सेनेचे सचिन मुळे पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकृष्ण पंधे हे होते सर्वप्रथम मान्यवराच्या हस्ते संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी रमेश पवार अरविंद चव्हाण संदीप पाटील यांनी संत सेवालाल महाराजाच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

अनेक दात्यांनी रक्तदान केले जयंतीनिमित्त पत्रकार बांधवांचा देखील सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला वसंतनगर देवानगर आईचा तांडा सावरगाव तेली येथील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते तर महिला आपले बंजारा पारंपारिक पोशाख घालून कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या समितीच्या वतीने सर्वांना महाप्रसादाचे वितरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संत सेवालाल महाराज उत्सव समितीच्या वतीने अथक परिश्रम घेतले सूत्रसंचालन राजेश नागरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय राठोड यांनी केले.

## मराठी पत्रकारांच्या साहित्याचा ठसा दिल्लीत उमटणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** साहित्याचा ठसा आता दिल्लीत उमटणार आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन मुंबई मराठी पत्रकार संघाने दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनस्थळी आयोजित केले आहे. संमेलनाची आमंत्रक संस्था सरहद आणि संस्थेचे प्रमुख संजय नाहर यांनी या आयोजनासाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे. दिल्लीत तालकटोरा स्टेडियम येथे २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संपन्न होणाऱ्या साहित्य संमेलनात पत्रकार संघाचा स्टॉल साहित्यप्रेमींचे लक्ष वेधून घेणार आहे. पत्रकार संघाचे सदस्य असलेल्या पत्रकारांनी लिहिलेले प्रत्येकी एक पुस्तक या स्टॉलवर असावे, असे आयोजन करण्यात येत आहे. या स्टॉलची जबाबदारी पत्रकार संघाचे अंतर्गत हिशोब तपासनीस प्रा. हेमंत सामंत आणि सदस्य राजेंद्र साळस्कर सांभाळणार आहेत. या प्रदर्शनात मांडण्यासाठी सदस्यांनी स्वलिखित पुस्तकांपैकी कुठल्याही एकाच पुस्तकाची प्रत' १६ फेब्रुवारीपर्यंत मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात आणून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गजानन मारोती सुरोशे यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा ढाणकी अध्यक्ष पदावर निवड


दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** ढाणकी सारख्या गावात राहून मोल मजुरी करणारा. गजानन सुरोशे आपल्या चर्मकार समाजासाठी अहो रात्र मेहेनत घेणारा. त्याने आपल्या समाजाला एकत्र यावे म्हणून नगरपंचायत ला संत रविदास महाराज सभागृह साठी जागेचा आग्रह धरला होता यात त्याच्यावर पोलीस कार्यवाही झाली. तो एक मोल मजुरी करून आपले घर चालवणारा यात परेशान झाला पण त्याने हार नाही मानली. आणि त्याने त्याच जोमाने आपल्या समाजाला एकत्र आणून दरवर्षी संत रविदास महाराजांची जयंती साजरी करतो.

माजी समाज कल्याण मंत्री आणि ज्येष्ठ समाजसेवक बबनराव (नाना) घोलप ज्यांनी चर्मकार बंधू आणि भगिनींना एकाच छताखाली आणण्यासाठी आणि समाजाचे संघटन व्हावे म्हणून २४ सप्टेंबर १९९५ रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघाची स्थापना केली होती.

ही संघटना स्थापन करून तळागाळातील समाज बांधवांची सेवा करून त्यांना एकत्र आण्याचा एकमात्र उद्देश ठेवला आणि हेच उद्देश समोर ठेऊन गजानन सुरोशे हा ढाणकी सारख्या गावात चर्मकार सामाजाला तो एकत्र करण्यासाठी धडपड करताना त्याची दखल सुद्धा बातमी पत्रात झळकत असल्याचे पाहून त्यांनी १२ फेब्रुवारी २०२५ या दिवशी संत शिरोमणी जगद्गुरु रविदासजी महाराज यांच्या जयंती मध्ये भव्य प्रबोधनाच्या कार्यक्रम मध्ये आमंत्रीत करून गजानन सुरोशे यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघ ढाणकी शहर अध्यक्ष म्हणून निवड केली.

यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघ नांदेड



संस्थापक बबनरावजी घोलप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष माधव गायकवाड नांदेड जिल्हा उत्तरध्यक्ष गजानन जोगदंड विदर्भ अध्यक्ष संभा वाघमारे माधवराव निंबाळकर तसेच उपस्थित पाहुणे उंबरखेड महागाव आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

तसेच या कार्यक्रमात उपाध्यक्ष करण कामाजी परतुडे तर सचिव पदी दीपक बंडू सुरोशे यांची निवड करण्यात आली. यावेळी सोपान पहूकर, विजय पहुकर, दिलीप पडतुडे, बबन पडतुडे, लक्ष्मण पहुकर, प्रभू गायकवाड, दत्ताजीराव गायकवाड बंडू सुरोशे, मारोती सुरोशे,आदित्य गायकवाड, वेदांत सुरोशे, हजारो चर्मकार समाजातील महिला आणि पुरुषांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा ढाणकी अध्यक्ष पदावर निवड झाल्या बद्दल त्याचे अभिनंदन केले.

## निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व; आर आर पाटील

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्र्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## मंगळवारी डोणगावमध्ये शनीदेव मूर्तीची प्रतिष्ठापना सोहळ्यास उत्साहात प्रारंभ; दिल्लीनंतर डोणगाव येथे सर्वात उंच मूर्ती

**डोणगाव/प्रतिनिधी :** दिल्लीनंतर देशातील दुसऱ्या क्रमांकाची उंच (११ फूट) व महाराष्ट्रातील सर्वात उंच शनीदेव मूर्तीची प्रतिष्ठापना मेहकर तालुक्यातील डोणगाव येथे १८ फेब्रुवारी रोजी करण्यात येत आहे. शनीदेव मूर्तीच्या प्रतिष्ठापनानिमित्ताने १५ ते १८ फेब्रुवारी दरम्यान चार दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मूर्तीची प्रतिष्ठापना व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे. येथील श्री संताजी महाराज सेवाभावी ट्रस्टच्या वतीने शनिदेव मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. दिल्ली येथे २१ फूट उंच शनीदेव मूर्ती असल्याचा दावा केला जातो, तर त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाची ११ फूट उंच मूर्ती डोणगाव येथे स्थापन होत आहे.



या सोहळ्याचे मार्गदर्शन शुक्ल यजुर्वेद क्रमपाठी वेदमूर्ती प्रवीण भागवतकार गुरुजी यांचे असून, १५ फेब्रुवारीपासून धार्मिक विधी सुरू झाले आहेत. गणेश पूजन व पुण्याहवाचनानंतर संध्याकाळी पूजा व आरती पार पडली.चार दिवस हा धार्मिक सोहळा चालणार आहे. या सोहळ्यासाठी शनिवारपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमही घेण्यात येत आहेत.तर, नांदुरा तालुक्यातील टाकरखेड येथेही जिल्ह्यातील एक महत्त्वाचे असे शनी मंदिर आहे. येथे ही भाविक मोठ्या संख्येने जातात. आता डोणगाव येथील शनी मुर्तीही आकर्षणाचे केंद ठरणार आहे.

चार दिवस चालणार प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात पूजन, मूर्ती महान्यास, देवता हवन, स्थापित देवता पूजन, प्राणप्रतिष्ठा, मूर्ती अभिषेक, पूर्णाहुती व १८ फेब्रुवारी रोजी महाप्रसाद वितरण आदी धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले आहे.या धार्मिक सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री संताजी महाराज सेवाभावी ट्रस्टचे अध्यक्ष विनोद प्रभाशंकर बोंडगे, सचिव गजानन इंगळे, विजय खरात आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी केले आहे. डोणगावातील मेहकर रोडवरील मदन वामन पातुरकर विद्यालयाच्याजवळ हा कार्यक्रम होत आहे.

संग्रहीत छायाचित्र



भाग १२

### जल जीवनच्या पाण्यासाठी

# कनकावाशी दोन वर्षापासून प्रतीक्षेत

**कोट्यावधी रुपयाचे काम अर्धवट**

**--------**

**३८ लाखाचा खर्च केला पाण्यात?**

## कनकावाशियांच्या घशाची कोरड कायम

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर : वर्षानुवर्षांपासून पाणीटंचाईमुळे डोक्यावर असलेला हंडा खाली उतरावा, महिलांची ग्रामस्थांची पाण्साठी होणारी पायपीट थांबावी या उदात्त हेतूने शासनाच्या वतीने पाणीपुरवठा योजनेअंतर्गत तब्बल एक कोटी ३७ लाख ९३ हजार रुपयांचा निधी खर्च करून होणार दोन वर्षांपूर्वी तालुक्यातील कनका येथील नळ योजनेच्या कामाला प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, तब्बल एका वर्षाच्या कामाला दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही अद्यापही काम अपूर्ण आहे. त्यामुळे कनकावासीयांच्या घशाची कोरड कायम असल्याने खर्च झालेला निधी हा व्यर्थ गेल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.**

तालुक्यातील कनका येथे पाणीपुरवठा योजनेअंतर्गत तब्बल एक कोटी ३७ लाख ९३ हजार रुपयांच्या नळ योजनेच्या कामाला मंजुरात मिळाली होती. सदर कामाला १२ जानेवारी २०२३ रोजी कार्यारंभ आदेश मिळाला.सदर काम बारा महिन्यांत करणे आवश्यक असताना आता दोन वर्षाच्यावर कालावधी झाला आहे. असे असतानाही काम अपूर्ण अवस्थेत आहे. प्रशासकीय कागदोपत्रीनुसार सदर कामे ६२.८६ टक्के झाले आहे. तर यावर ३८ लाख ४० हजार रुपयांचा खर्च झाला आहे. या योजनेअंतर्गत विहीर, पंपगृह,पंपिंग मशिनरी, मुख्य जलवाहिनी, पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था करणे अपेक्षित आहे व सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत विहिरीचे बांधकाम, पाईपलाईन, खोदकाम पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्था ही प्रगतीत असल्याचा शेरा शासकीय अधिकाऱ्यांनी मारला आहे. संबंधित कंत्राटदाराकडून केले जात असून आतापर्यंत ३८ लाख ४० हजार रुपये खर्च करून ६२.८६ टक्के काम झाले असल्याचे कागदपत्रावरून दिसून येत आहे. सदर काम बारा महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित असताना आता दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही काम पूर्ण झाली नाही. याकडे मात्र, अधिकाऱ्याचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याने कनकावासीयांच्या घशाची कोरड कायम राहिली आहे.शासन कोट्यवधी रुपये खर्च करून समस्या निवारण्याचे काम करत असले तरी, अधिकारी व ठेकेदार मात्र शासनाच्या निधीला चुना लावत स्वहीत असल्याचे चित्र पाणीपुरवठा योजनेतून दिसून येत आहे.अधिकाऱ्यांच्या या दुर्लक्षित धोरणामुळे मात्र कनकावाशीयांना पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच पदाधिकाऱ्यांनी लक्ष देऊन वेळेत काम न करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच उर्वरित काम तात्काळ पूर्ण करून पाणीपुरवठा योजना सुरू करावी, अशी मागणी कनका वाशीयांकडून केली जात आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



## निसर्गाचा रंगोत्सव सुरू:शिरपूरमधील शेत शिवारात बहरला पळस, पूर्वी पळसाच्या फुलांपासून रंग बनवून साजरी व्हायची रंगपंचमी

**दैनिक आपला विदर्भ**

**शिरपूर/प्रतिनिधी :** होळी व धुलीवंदन जवळ आली की आणि शिशिर ऋतू ची थंडी ओसंरायला लागली कि हमखास आठवण होते ती पळसाच्या फुलांची. भर उन्हात सगळी सृष्टी ओसाड पडू लागली असताना आपण रस्त्याने जाताना दूरवर नजर टाकली तर आपल्याला एक झाड फुलले दिसते. केशरी रंगाची भरगच्च फुले लागलेली ही झाडे असतात पळसाची. केसरी पळस सगळ्यांच्याच परिचयाचा आहे; असेच असंख्य पळस शिरपूर परिसरात फुललेले दिसतायेत या पळसा च्या झाडचा व फुलांचा औषधीसाठी उपयोग केला जातो. या पळसाबद्दल अंधश्रद्धादेखील आहे. त्यामुळेच जादूटोणा करणार्यांना नेहमीच या झाडाची ओढ असते. ही जरी अंधश्रद्धा असली तरी या झाडाचे आकर्षण सगळ्यांनाच आहे. व पाळसाला धार्मिक महत्व खूप दिले जाते बैलपोळ्याच्या दिवशी प्रत्येक घरी पळसाची छोटी डहाळी दाराच्या दोन्ही बाजूला एक एक ठेवतात , त्याला एक विशेष नाव आहे ' मेढे ', दुसऱ्या दिवशी त्या मेढ्यांना एकत्र गोळा करून त्याला गावाबाहेर नेऊन टाकतात .केशरी रंग आहे म्हणूनच तर पळस हा विस्तवाच्या गोळ्यासारखे दिसते म्हणूनच तर पळसाला ' फ्लेम ऑफ द फॉरेस्ट ' असे संबोधतात. पळसाचे नाव ढाक, टेसू , ब्रह्मपुष्प असेही आहे. व कालिदासांनी तर पळसाला चक्क ' ऋतुसंहार ' हे नाव दिले आहे व पूर्वीच्या काळी लोक होळीच्या सणात नैसर्गिक केशरी रंग तयार करण्यासाठी पळसाची फुलं वापरली जातात आणि पाळसाचे अनेक असे औषधी गुणधर्म आहेत असे शिरपूरातील जानकर मंडळींनी यांनी सांगितले आहे.



### संभाजीराजांवरचं अतीव प्रेम, विकीचा अभियन बघून चाहता भावुक, बॅनरला दुग्धाभिषेक घातला!

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सगळीकडे फक्त आणि फक्त 'छावा' चित्रपटाचीच चर्चा आहे. काल १४ फेब्रुवारीला हा चित्रपट रिलीज झाला. चित्रपट रिलीज होताच सिनेमाला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळत आहे. गेल्या कित्येक महिन्यांपासून शिवप्रेमी आणि एकूणच प्रेक्षकवर्ग या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. आता ही प्रतीक्षा संपली असून प्रेक्षकांना हा थरार अनुभवायला मिळत आहे. १४ फेब्रुवारीला 'छावा' हा सिनेमा महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील सिनेमागृहात दाखल झाला. यानंतर सिनेमावर प्रेक्षकांनी प्रेमाचा वर्षाव केला आहे. प्रत्येक वयोगटातील प्रेक्षक हा सिनेमा पाहून मंत्रमुग्ध झाला आहे. संभाजी राजांचे बलिदान रुपेरी पडद्यावर पाहताना प्रत्येकाच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. एकूणच या सिनेमाला खूप चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. दरम्यान, नुकताच एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यात एका चाहत्याने चित्रपटाच्या पोस्टरवर दुधाचा अभिषेक केला आहे. स्वतः विकी कौशलने हा व्हिडिओ त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे.

# शिरपूर तालुक्यात मोठी कारवाई: ५१.२७ लाख रुपयांचा गांजा जप्त, आरोपी फरार

**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर तालुका पोलीस ठाणे आणि वनविभागाच्या संयुक्त कारवाईत ५१.लाख गांजा जप्त करण्यात आला आहे. शिरपूर तालुक्यातील दुर्गम वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गांजाची लागवड केल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्या नेतृत्वाखाली छापा टाकण्यात आला.

दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलीसांना माहिती मिळाली की आसरापाणी गावातील भियासिंग दिलदार पावरा आपल्या वनजमिनीत गांजाची झाडे तोडत आहे आणि





लवकरच संपूर्ण माल नष्ट करण्याच्या तयारीत आहे. त्वरित कारवाई करत, पोलिसांनी घटनास्थळी ११२.७५० किलो सुका गांजा आणि ८०० किलो ओली झाडे जप्त केली. यानंतर, पुढील तपासादरम्यान हाडाखेड गावच्या वनजमिनीत अंदाजे १२०० किलो गांजाच्या झाडांची लागवड आढळून आली. हा परिसर वनपट्टाधारक दशरथ रिशा पावरा याने कसत असल्याचे वनविभागाच्या नोंदीतून स्पष्ट झाले. या ठिकाणी आढळलेल्या गांजाची किंमत २४ लाख रुपये असल्याचा अंदाज आहे.

पोलीस कारवाईची माहिती मिळताच आरोपी पळून गेले. त्यांच्याविरोधात एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत (कलम ८(क), २०(ब)ळळ(क) आणि २२(क)) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज कचरे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यात पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोसई मनोज कचरे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी काशिनाथ देवरे यांच्यासह पोलीस आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

शिरपूर तालुक्यातील दुर्गम भागांमध्ये गांजाची लागवड वाढत असल्याने यावर कडक नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांनी आणि वनविभागाने संयुक्त मोहिमा राबवण्याचा निर्णय घेतला आहे. फरार आरोपींच्या शोधासाठी शोधमोहीम सुरू असून, लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पनवेल आणि कळंबोली मधील १७ रिक्षा चोरीप्रकरणी आरोपीला बुलढाण्यातून अटक



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** :नवी मुंबईतील पनवेल आणि कळंबोली मधील तब्बल १७ रिक्षा चोरीचे गुन्हे दोन्ही ठिकाणी दाखल झाले. दाखल गुन्ह्याची गंभीर दखल घेत पनवेल पोलिसांनी सीसीटीव्ही आणि इतर तांत्रिक मदतीच्या साह्याने एका संशयित व्यक्तीला बुलढाण्यात जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. कसून चौकशीत त्याने १७ रिक्षांची चोरी पनवेल आणि कलंबोली मधूनच केल्याचे स्पष्ट झाले. दोन्ही ठिकाणी गुन्ह्यांची नोंद झाली असून, आरोपी निसार खान पनवेल मधील कच्छी मोहल्ला इथे राहून चोरी करत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीला अटक करून त्याला कोर्टात हजर हजर करून पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, चोरी गेलेल्या १२ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या एकूण १८ रिक्षा हस्तगत केल्या असून,पनवेल पोलीस अधिक तपास करत आहेत.

### मुंबई मनपा व वृक्ष प्राधिकरण यांच्यावतीने वृक्षप्रेमींसाठी प्रदर्शन





दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :मुंबईत मधील वृक्षप्रेमींसाठी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सुंदर पर्वणी चे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई मनपा व वृक्ष प्राधिकरण यांच्या वतीने मुंबई मधील आकर्षक झाडे, फुले, फळे व भाज्यांचे प्रदर्शन मुलुंड च्या डॉ. चिंतामण द्वारकानाथ देशमुख उद्यान येथे भरवण्यात आले आहे. यंदाच्या वर्षी जलचर प्राणी ही थीम ठेवण्यात आली आहे. हजारोंच्या संख्येने हे नेत्रदिपक प्रदर्शन पाहण्यास वृक्ष प्रेमी उपस्थित राहतात. आमदार मिहीर कोटेच्या यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन पार पडले. या प्रदर्शनात तीन हजारांपेक्षा जास्त झाडे आहेत. ज्यात फुल, फळ, औषधे, बोंजाय अश्या विविध झाडांचा समावेश आहे. तसेच फुलांसापासून साकारलेले विविध जलचर प्राणी आणि देखावे या मुळे हे प्रदर्शन नेत्रदीपक वाटते आहे. आज सकाळ पासूनच मुंबई मधील वृक्षप्रेमींनी या प्रदर्शनला गर्दी केली आहे.

### माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची पत्रकार परिषद



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : नुकताच देशाचं अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलं होत. याबाबत आज राज्याचे माजी अर्थमंत्री व आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत पत्रकार परिषदेत माहिती दिली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, अनुसूचित जाती जमातीचे उद्योजक, मध्यमवर्गीय यांना दिलेल्या सवलतींमध्ये कुठेही कात्री न लावता उलट त्यामध्ये भरघोस वाढ केली आहे. सोबतच जगात भारताला जीडीपी मध्ये ३ ऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवायचा आमचा संकल्प आहे अशी माहिती दिली.

चंद्रपूर जिल्ह्यातील युवक-युवतींना व्यावसायिक पायलट बनण्याचे स्वप्न पूर्ण होणार असून, मोरवा येथे चंद्रपूर फ्लाईंग क्लबचे काम आता पूर्णत्वास आले आहे. पायलट होण्यासाठी २०० तास विमान उडविण्याचे प्रशिक्षण घ्यावे लागते. मात्र, त्यासाठी ५० ते १ कोटीपर्यंत खर्च येतो मात्र आपल्या जिल्ह्यात हे शुल्क २ लाख रुपये आहे.




# जलजीवन मिशनच्या कामात सर्वत्रच गौडबंगाल

## ▪ अधिकारी व कंत्राटदारांची मनमानी ▪ शासनाच्या निधीवर डल्ला

## अंजनी बुद्रुककडे आमदार सिद्धार्थ खरात देणार विशेष लक्ष : उच्चस्तरीय लावणार चौकशी



**मेहकर: तालुक्यातील ९२ व लोणार तालुक्यातील ६० गावात जलजीवन मिशन अंतर्गत काम करण्यात येत आहे. परंतु, अधिकारी व कंत्राटदारांनी मनमानी करून शासनाच्या निधीवर डल्ला मारण्याचे काम केले आहे. जलजीवन मिशनच्या कामात सर्वत्रच गौडबंगाल सुरू असून या संदर्भात लवकरच बैठक घेत नागरिकांच्या अपेक्षेनुसार दोषींवर कारवाई करण्यासाठी निर्देश दिले जाणार आहेत. अशी माहिती मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली. तर अंजनी बुद्रुक येथील प्रकरणे गंभीर असून या प्रकरणाकडे मी गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश देणार आहे व संबंधित दोषींवर कारवाई करून कोणत्याही स्थितीत सदर पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास नेणार असल्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले.**



यावेळी ते म्हणाले की, मेहकर तालुक्यात ९२ गावात जलजीवन मिशनचे काम सुरू आहे. तर, लोणार तालुक्यात ६० गावात जलजीवन मिशनचे काम सुरू आहे. परंतु, अधिकारी व कंत्राटदारांनी याकडे गांभीर्याने लक्ष न देता केवळ निधीवर डल्ला मारण्याचे काम केले आहे. तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील ग्रामपंचायतच्या वतीने तब्बल सात वेळा निवेदन दिले आहेत. परंतु, त्याची दखल घेण्यात आली नाही. केवळ पाईपलाईन अंथरून बिले काढून निधी हडप करण्यात आला आहे.पाण्याचा सोर्स न पाहता केवळ कामे करून शासकीय निधीला चुना लावण्याचे काम करण्यात आले आहे.मेहकर तालुक्यातील जलजीवन मिशनचे योजना ही भ्रष्टाचारामुळे सर्वत्र चर्चेत आली आहे. या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बोललो आहे.या संदर्भात लवकरच बैठक घेऊन उन्हाळ्यातील पाणीटंचाई पाहता कामे करण्याचे आदेश दिले जातील, तसेच अंजनी बुद्रुक येथील प्रकरणे अतिशय गंभीर असून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश दिले जाणार आहेत. सदर पाणीपुरवठा योजनाही लवकरच पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणार असून संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावरही कारवाई करण्यासाठी संबंधित वरिष्ठांकडे मागणी करणार आहे. अशी माहिती माहिती आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

### निकृष्ट कामामुळे वाहते रस्त्यावर पाणी

अंजनी बुद्रुक येथे कोट्यवधी रुपयाच्या निधी खर्च करून करण्यात आलेल्या जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. तर, ग्रामपंचायतला लाखो रुपयाचा भ्रुदंड बसला आहे. गावातील मुख्य रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे पाईप वापरण्यात आल्याने ते फुटून हजारो लिटर पाणी वाहून जात आहे. एकीकडे पाण्यासाठी जनतेची वाताहात सुरू असताना दुसरीकडे मात्र निकृष्ट कामामुळे हजारो लीटर पाणी वाहून जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. सदर कामा संदर्भात वारंवार तक्रारी केल्यानंतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे डोळेझाक केल्याने यामध्ये अधिकारी व ठेकेदाराची मिली बघत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. सदर प्रकरणाकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन या कामाची सखोल चौकशी करत दोषींवर कारवाई करावी,अशी मागणी अंजनी बुद्रुक येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतले श्रींचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

▪ देवानंद सानप

**बुलडाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष बुलढाण्याचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेशाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या १८ फेब्रुवारी रोजी ते मुंबईत प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार एका विशेष समारंभात ते स्वीकारणार आहेत. दरम्यान, आज शनिवारी त्यांनी संत नगरी शेगावात पोहोचून श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी आपण कुठलीही गटबाजी करणार नसून, सर्वांना सोबत घेऊन पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### भावकीचा वाद बेतला जीवावर, नाशिकमध्ये दोन गटात जोरदार राडा, कारखाली चिरडून तरुणाचा काढला काटा

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या सिन्नर तालुक्यात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास दोन गटात तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला आहे, तर १३ जण जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. मयताच्या अंगावर कार घालून त्याला चिरडण्यात आल्याची चर्चा आता सिन्नरमध्ये रंगली आहे.

## चालत्या बसमध्ये दोन महिलांचा चोरीचा प्लॅन, युवकाला कुणकुण लागली अन् पुढे घडले असे...

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. आता नंदुरबार-धुळे बसमध्ये दोन महिलांनी चोरी करण्याचा प्लॅन आखला होता. मात्र, तरुणाच्या सतर्कतेमुळे बसमधील ४ लाखांची चोरी उघड झाली आहे. या प्रकरणी दोन्ही महिलांना पोलिसांनी अटक केली असून रोकड पोलिसांनी जप्त केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शिवाजी पाटील हे दोंडाईचा येथून धुळे येथे येण्यासाठी नंदुरबार-धुळे बसमध्ये प्रवास करत होते. यावेळी सोनगीर येथून दोन महिला बसमध्ये चढल्या. त्यातील एक महिला शिवाजी पाटील यांच्या शेजारी बसली. तिने नगाव चौफुली (देवपूर, धुळे) येथे पाटील यांच्या बॅगेची चैन उघडून त्यातील ४ लाख ९ हजार ५०० रुपये काढून दुर्सया महिलेने दिलेल्या बॅगेत ठेवले. ही बाब बसमध्ये असलेल्या मोहित समाधान पाटील याच्या लक्षात येताच त्याने आरडाओरडा केली. तसेच बस थेट देवपूर पोलीस ठाण्यात आणली. त्यानंतर महिला पोलीस कर्मर्चायांनी संशयित महिलांची व त्यांच्या बॅगची झडती घेतली असता संपूर्ण रक्कम मिळून आली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही महिलांना ताब्यात घेतले आहे. पद्मा राहुल शेट्टी (२०, रा. चिखलठाणा, छत्रपती संभाजीनगर) व अक्षया राजन शेट्टी (२०, रा. चिखलठाणा, छत्रपती संभाजीनगर) अशी दोघा महिला चोरट्यांची नावे आहे. याप्रकरणी देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

शुक्रवारी धुळे शहरातील वल्लीपुरा मौलवी गंज परिसरात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेला प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याचा साठा अन्न व औषध प्रशासनाने जप्त केला आहे. आझाद नगर पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाच्या संयुक्त पथकाने गोडाऊनवर छापा टाकला असता, मिराज, रजनीगंधा, विमल, राजनिवास यांसारख्या विविध ब्रँडच्या गुटखा व पान मसाल्याचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला.

## जल जीवन साठी सरपंचासह वाकदवारियांचे उपोषण चालू; उपोषणाचा सातवा दिवस..

### कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईसाठी वाकद ग्रामस्थांचे साखळी उपोषण सुरूच

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** : जलजीवन मिशनचे काम पूर्ण करण्यात न आल्याने गावात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाखो रुपयांचा खर्च करूनही जलजीवन मिशनचे काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदार दंडात्मक कारवाई करावी, या मागणीसाठी रिसोड तालुक्यातील वाकद येथील ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १० फेब्रुवारीपासून साखळी उपोषण सुरू केले आहे. सहाव्या दिवशीही सदर उपोषण सुरूच असून शासन दरबारी मात्र, या उपोषणाची दखल घेण्यात न आल्याने कर्तव्यनिष्ठ अधिकारीही कंत्राटदराची पाठराखण करीत आहेत की, काय असा प्रश्न या नियमित्ताने उपस्थित होत आहे.

रिसोड तालुक्यातील वाकद येथे भीषण पाणीटंचाई निर्माण होते. या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी खर्च करून जलजीवन मिशनतंर्गत पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात येत आहे. मात्र, सदर काम करणाऱ्या कंत्राटदाराने जलजीवन मिशनचे काम अद्यापही पूर्ण केले नाही. त्यामुळे उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, यासाठी २६ जानेवारी रोजी ग्रामसभेने ठराव घेतला होता. त्यानुसार सदर कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, यासाठी १० फेब्रुवारी रोजीपासून सरंपच, उपसरपंच, सदस्य यांच्यासह ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. गेल्या सहा दिवसांपसून सुरू असलेली हे उपोषण शासन दरबारी मात्र बेदखल असल्याने उपोषण कर्त्यांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कंत्राटदाराच्या भ्रष्टवृत्तीमुळे वाकद येथील जनतेवर पाणीटंचाईची गंभीर समस्या ओढविली आहे. गावामध्ये सध्याच पाणीटंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना टँकर पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई भीषण रूप धारण करण्याची शक्यता आहे. या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढावा यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून २९ डिसेंबर २०२२ पाणीपुरवठा योजनेच्या कामाला कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. या कामाला आता दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही सदर पाणीपुरवठा योजना सुरू झाली नाही, रोजी मात्र, गावात पाणीटंचाईची समस्या कायम आहे. अधिकाऱ्याच्या दप्तरी मात्र सदर पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास झाली असून त्याचे टेस्टिंग सुद्धा घेण्यात आले असल्याचे रिसोड उपविभागीय अभियंता यांच्या पत्रात नमूद केले आहे. मात्र, गावांमध्ये कोणताही पाणीपुरवठा करण्यात आला नाही.त्यामुळे शासनाची दिशाभूल करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करावी व शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी व शासकीय निधीचा अपहार प्रकरण दंडात्मक कारवाई करावी, या मागणीसाठी वाकद येथील नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. सदर उपोषण सहाव्या दिवशीही सुरूच असून शासन दरबारी मात्र सदर उपोषण बेदखल असल्याने उपोषणकर्त्यांमध्ये शासनापती तीव्र रोष व्यक्त केला जात आहे...






# दोन वर्षाच्यावर कालावधी लोटूनही केवळ २४ टक्के काम

## दोषी अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

## अधिकाऱ्यांचे उदासीन धोरण

# ग्रामस्थांना मारक



भाग १४

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला शुद्ध व मुबलक पाणी मिळावे, यासाठी तब्बल एक कोटी ९९ लाख रुपये खर्च करून तालुक्यातील आरेगाव येथे करण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेला अधिकाऱ्याच्या उदासीन धोरणाची दृष्ट लागली आहे. परिणामी दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास गेली नाही. परिणामी, नागरिकांची पाण्यासाठी होणारी ससेहोलपट कायम असल्याने शासनाच्या योजना पूर्णत्वास न नेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व वाढीव खर्च हा संबंधित अधिकाऱ्याकडून वसूल करून पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास न्यावी, अशी मागणी आरेगाव येथील नागरिकांकडून केली जात आहे.**

मेहकर तालुक्यातील आरेगाव येथील पाणीटंचाई कायमस्वरूपी निकाली निघावी, यासाठी शासनाच्या वतीने पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जल जीवन मिशन अंतर्गत तब्बल १ कोटी ९९ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधी अंतर्गत ८ ऑगस्ट २०२२ रोजी कामास कार्यारंभ करण्याचा आदेश देण्यात आला होता व जल जीवन मिशन योजनेचे काम हे १८ महिन्यात पूर्ण करण्याचे अपेक्षित होते. तसेच या निधी अंतर्गत विहीर, पंपगृह, पंपिंग मशिनरी, मुख्य जलवाहिनी, पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था आदी कामे करण्याचे अंदाजपत्रकात नमूद आहे.सदर कामाला दोन वर्षाच्या वर कालावधी झाला असताना यातील कामे अद्यापही अपूर्ण आहे. सदर कामे रखडलेली असल्याने आरेगाव येथील नागरिकांना पाण्याच्या सुविधेपासून वंचित राहावे लागले आहे. एकीकडे शासन कोट्यावधी रुपयाचा खर्च करून पाण्याची सुविधा निर्माण करीत आहे. तर, दुसरीकडे लाखो रुपये महिन्याला पगार घेणारे व शासकीय आलिशान वाहनात फिरणारे अधिकारी मात्र, आपल्या कर्तव्याला हरताळ फासत असल्याने जल जीवन मिशन अथवा पाणीपुरवठा योजनेची कामे ही वेळेत कोणतेही पूर्ण झाली नसल्याचे चित्र आहे.आरेगाव येथील पाणीपुरवठा योजनेचे काम करण्याचा कालावधी १८ महिन्याचा असताना या कामाला तब्बल दोन ते अडीच वर्ष होत आहेत. तरीही सदर काम पूर्णत्वास गेले नाही. परिणामी, आरेगाव येथील पाणी समस्या कायम राहिली आहे. याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन कामचुकारपणा करणाऱ्या अधिकारी व संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी आणि प्रलंबित असलेली योजना पूर्ण करावी अशी मागणी आरेगाव येथील जनतेकडून केली जात आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## दोषीवर कारवाई करून तत्काळ पाणीपुरवठा योजना सुरु करा; अन्यथा आंदोलन

### शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे विभाग प्रमुख पवन टाले यांचा इशारा

आरेगाव येथे तब्बल एक कोटी ९९ लाख रुपये खर्च करून शासनाने पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू केले आहे. सदर कामाला ऑगस्ट २०२२ रोजी कार्यारंभ आदेश असताना व १८ महिन्यात सदर काम पूर्ण करणे अपेक्षित असताना अद्यापही काम पूर्ण झाले नाही, त्यामुळे गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. गावातील महिलांना पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करावी लागत आहे. तर, शासनाचा कोट्यवधी रुपयाचा निधी हा पाण्यात जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.गावातील भीषण पाणी टंचाई लक्षात घेता तत्काळ पाणीपुरवठा योजना सुरू करावी व सदर काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या अधिकारी व ठेकेदाराची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना विभागप्रमुख पवन टाले यांनी दिला आहे.संबंधित मागणीची दखल न घेतल्यास होणाऱ्या परिणामाला संबंधित विभाग जबाबदार राहील असा इशाराही पवन टाले यांनी दिला आहे.

## संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात नायब तहसिलदार विजय हिवाळे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नाझर विनोद कंकाळ, जिल्हाधिकारी कार्यालयातील कैलास राऊत, मनोज धंदर, अनंता कहाते, साहील अख्तर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस फुलपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.



## माझ्या नियुक्तीमुळे विरोधक घाबरले आहेत; हर्षवर्धन सपकाळ यांची बीजेपीवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** माझ्या विरोधात बोलण्याकरिता काही नाही, मला अटक केल जाईल किंवा मला कोणाचा फोन येईल, चूप बैस असं बोल तसं बोल. बीजेपीची पॉलिसी अशी राहिली आहे की, आपल्या विरोधात कोणाला बोलू द्यायचं नाही.आता माझ्या नियुक्तीमुळे विरोधक घाबरलेले आहेत. मात्र येणाऱ्या काळात बीजेपी चे वाभाडे काढल्याशिवाय राहणार नाही, बीजेपीला उघडे पाडेल, असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, माझ्या विरोधात बोलण्याकरिता काही नाही, माझी बदनामी करण्याचा हा प्रयत्न आहे. काँग्रेस पक्ष सव्वाशे वर्षाचा जुना आहे. या पक्षाला इतिहास आहे. मी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता असल्यामुळे या सगळ्या प्रश्नांची उत्तरे थोड्या दिवसात देणारच आहे. मी एक छोटा कार्यकर्ता आहे.माझी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नाही. मात्र, पक्षासाठी ही महत्त्वाकांक्षा आहे की, पक्ष मजबूत व्हावं, मी कुठलीही गटबाजी करणार नाही, मी सर्वांना सोबत घेऊन पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मला वरिष्ठ मार्गदर्शन करतील त्यानुसार मी चालेल.

मूळ मुद्दा असा आहे. की, पैसे नसताना अनेक योजना चालू केल्या. विकासाची कामे सुरू केली फक्त त्याचे भूमिपूजन करून टाकले. आता ठेकेदाराला पैसे द्यायला तिजोरीत पैसे नाहीत. राज्यात २ हजार कोटी रुपयांची महसुली तूट पडली आहे. आता भाजपाने केंद्रातून दोन हजार कोटी रुपयांचा निधी आणून ही महसुली तूट काढावी, अशी अपेक्षा यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली. तसेच आमदार सुरेश धस यांनी टीआरपी वाढवण्याकरता केलेला हे सगळं प्रकरण होतं.

राष्ट्रवादी काँग्रेसला महत्त्व कमी करण्याकरता भाजपच्या मुख्यमंत्र्यांनी आमदार धस यांना दिलेली सूचना होती आणि त्याच्या पलीकडे जाऊन पहिले आगा आगा आगा... बंदूक बंदूक बंदूक .... रेती रेती रेती... टिप्पर टिप्पर टिप्पर... असे शब्द रांगड्या भाषेत मांडल्या जात होती. मात्र, आता हे शब्द मागे पडलेत आणि आता मांडवली मांडवली मांडवली... या शब्दाची गुंज या प्रकरणातून ऐकू येत आहे. अशी टीका काँग्रेसचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

# दहावी, बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार कराल तर होईल गुन्हा दाखल

- विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांना इशारा
- जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियानाची कडक अंमलबजावणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेला ११ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून, जिल्ह्यात परीक्षा प्रक्रियेत शिस्त आणि पारदर्शकता राखण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना केल्या जात आहेत. परीक्षा केंद्र परिसरात गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जात असून, गैरप्रकार करताना आढळणाऱ्या विद्यार्थी, पालक, शिक्षण, कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला जाईल, याशिवाय मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार सामूहिक कॉपी आढळलेल्या परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याचा इशारा जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

परीक्षांमध्ये गैरप्रकारांना रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत 'कॉपीमुक्त अभियान' राबविले जात आहे. दहावी, बारावीची परीक्षा सुरळीतपणे पार पडाव्या यासाठी पालकांना व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच परीक्षेत गैरप्रकार करताना आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येत आहे. अशा प्रकारांना प्रोत्साहन व मदत करणाऱ्यावरही थेट कारवाई करण्याचा निर्देश राज्य शिक्षण मंडळाने दिले आहे.

### परीक्षांवर प्रशासनाचा वॉच

बुलढाण्यात बारावी परीक्षा ११ ते १८ मार्च दरम्यान होणार असून, ३४,५३५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान होणार असून, ४०,९१४ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. जिल्ह्यात बारावीचे ११६ व दहावीचे १५९ परीक्षा केंद्र असून या केंद्रांवर ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हास्तरावर एकूण सहा भरारी पथके तसेच प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार यांचे एकूण १३ भरारी पथके तसेच पाच उपविभागीय अधिकारी यांची भरारी पथके असे एकूण २४ भरारी पथक कार्यरत असून बारावीच्या ११६ केंद्रावर ११६ बैठे पथक तसेच दहावीच्या १५९ केंद्रावर १५९ बैठे पथक नियुक्त करण्यात आलेले आहेत. या परीक्षांवर कडक लक्ष देण्यासाठी सीसीटीव्हीद्वारे निगराणी ठेवली जात आहे. परीक्षा कक्षामध्ये मोबाइल फोन आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर बंदी घातली आहे. परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना शांततेत परीक्षा देता यावी यासाठी हे कॅापामुक्त अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत केंद्रावर कॅापी पुरविणाऱ्या पालक, अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांवर कारवाई केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार बुलढाण्याच्या कॅापीमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे, अशी माहिती शिक्षणाधिकारी (मा) यांनी दिली आहे.

### संशयित विद्यार्थ्यांची होणार तपासणी

परीक्षेदरम्यान संशयित विद्यार्थ्यांची तपासणी केली जाणार आहे. परीक्षेत कॉपी अथवा अन्य कुठलाही गैरप्रकार आढळल्यास गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षेच्या पारदर्शकतेस बाधा आणणाऱ्या विद्यार्थी, पालक किंवा अन्य व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

### आत्मविश्वासाने परीक्षा द्या

विद्यार्थ्यांनी परीक्षेची योग्य तयारी करून आत्मविश्र्वासाने परीक्षा द्यावी. गैरप्रकार न करता प्रामाणिकपणे यश मिळवावे. पालक आणि शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना कॅापी न करता परीक्षा देण्यास प्रवृत्त करावे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी परीक्षेतील गैरप्रकार रोखणे ही सर्व नागरिकांची जबाबदारी आहे. या कॉपी मुक्त अभियानात पालकांनी विद्यार्थ्यांना योग्य रित्या परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित करुन सहकार्य करावे, असे आवाहन देखील जिल्हा प्रशासनाने केले आहे.